# विद्यार्थ्यांना विशेष महत्वाच्या सूचना

१) महाविद्यालयात प्रवेश घेतांना विद्यार्थ्यांना आवश्यक शुल्क भरावे लागेल. विविध सवलती प्राप्त विद्यार्थ्यांना विशिष्ट फॉर्ममध्ये मुदतीच्या आत सवलत अर्ज आवश्यक कागदपत्रासहीत महाविद्यालयाच्या कार्यालयात सादर करावा. विद्यार्थ्यांनी हा सवलत अर्ज कार्यालयात दाखल करतांना सबंधित लिपीकाकडुन तो प्राप्त झाल्याची पोच आग्रहपूर्वकं मागून घेऊन स्वतःजवळ काळजीपूर्वक ठेवावी.

२) वार्षिक शुल्क नामांकन शुल्क व इतर शुल्कामध्ये काही बदल झाल्यास तशी सूचना कार्यालयाच्या वार्ताफलकावर वेळोवळी लावण्यात येईल व त्यानुसार विद्यार्थ्यांना शुल्क भरावे लागेल. नामांकन अर्ज विद्यार्थ्यांने स्वहस्ताक्षरात भरावा.

३) विद्यार्थ्याला काही अडचण असल्यास त्यांनी प्रथम मुख्य लिपिक व नंतर प्राचार्याशी प्रत्यक्ष संपर्क साधून आपली अडचन सोडवून घ्यावी.

४) पूर्व सूचनेशिवाय विद्यार्थी वर्गात गैरहजर असल्यास प्रत्येक विषयाच्या तासास नियमानुसार दंड आकारण्यात येईल. ७५% हजेरी नसल्यास प्रवेश रद्द केला जाईल.

५) विद्यापीठाच्या नियमानुसार प्रवेश घेण्याची अंतिम तारीख म्हणून जाहीर केलेल्या तारखेनंतर प्रवेश मिळणार नाही.

६) प्रवेश अर्जात स्वतःच्या फोटोसहीत आवश्यक ती माहिती काळजीपुर्वक भरावी अन्यथा अर्ज नामंजूर होण्याची शक्यता आहे. फोटोशिवाय आलेला अर्ज स्विकारल्या जाणार नाही.

७) महाविद्यालयीन वर्गात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याला शारीरिक शिक्षण अनिवार्य आहे.

८) विद्यापीठाने वेळोवेळी पाठविलेली माहिती व नियम या माहिती पत्रकात दिलेली आहे. नवीन येणारी माहिती सूचना द्वारा वेळोवेळी कळविण्यात येईल.

९) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे निमय संबंधित परिक्षार्थी व प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू राहील.

१०) निरनिराळ्या वेळी महाविद्यालयातर्फे अयोजित कार्यक्रमाला उपस्थित राहणे आवश्यक आहे.

११) महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या व आपणास आवडेल त्या खेळात भाग घ्यावा.

१२) कार्यालयातून प्रसारीत होणाऱ्या अधिसूचनासाठी दररोज माहिती फलक बघावा त्याच प्रमाणेआवश्यक कार्यवाही करावी.

१३) डुप्लीकेट टी.सी. वर प्रवेश मिळणार नाही.(काही अपरिहार्य कारणास्तव प्रवेश दिला जावु शकतो.)

१४) प्रत्येक विद्यार्थ्यांने १) प्रवेश अर्ज (२) इ.बी.सी. अर्ज (३) शिष्यवृत्तीचे अर्ज (४) विद्यापीठ परिक्षेची आवेदन पत्र (५) विद्यार्थी फंड इ. कागदपत्र कार्यालयात सादर करताच संबंधित लिपीकाकडून छापील फार्मवरील त्याचे सहीचे अर्ज मिळाल्याबद्दल पावती घ्यावी व सांभाळून ठेवावी.

१५) ई.बी.सी. कागदपत्र अर्जासोबत किंवा प्रवेशानंतर ३१ जुलै पुर्वी सादर करावेत.

१६) शारिरीक क्षमता चाचणीला विद्यापीठ नियमानुसार उपस्थित असणे आवश्यक आहे. अनुपस्थितीबद्दल २५ रू. दंड आकारण्यात येईल.

१७) प्रवेश अर्जासोबत सर्टिफिकेटच्या सत्यलिपी जोडाव्यात परंतु शाळा किंवा महाविद्यालय सोडल्याचा दाखल्याची मूळ प्रत (ओरिजनल टी.सी.) प्रवेश घेते वेळी द्यावी लागेल.

१८) ईतर शुल्क – पूर्ण फी भरण्याऱ्या विद्यार्थ्यांला प्रवेश घेतेवेळी संपूर्ण शूल्क भरावे लागेल तसेच ई.बी.सी. व शिष्यवृत्ती धारकांना इतर सवलती धारकांना ईतर शुल्क (जे सरकारकडून मिळणार नाही ते) प्रवेश घेते समयी भरावे लागेल. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठा व्यतीरीक्त ईतर विद्यापीठाचे विद्यार्थ्यांना प्रवेश घेतल्यानंतर १०० रू. मायग्रेशन फी भरावी लागेल. प्रवेश मिळताच स्थानांतर प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.

१९) महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थ्याने कोणत्याही कारणाने महाविद्यालयात येणे बंद केल्यास किंवा महाविद्यालय सोडल्यास पूर्ण वर्षाचे शुल्क भरावे लागेल. त्याशिवाय विद्यार्थ्यांला कोणतेही प्रमाणपत्र मिळणार नाही.

२०) महाविद्यालयाचे परिसरात धुम्रपान करणे, गुटखा किंवा अंमली पदार्थ सेवन, कर्मचाऱ्यांशी गैरवर्तन करणे दंडनिय आहे.

२१) प्रजासत्ताक दिन (दि. २६ जानेवारी), स्वातंत्र्य दिन (दि. १५ ऑगस्ट) रोजी सर्वच विद्यार्थ्यांना उपस्थित राहणे. अनिवार्य राहील. अनुपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रति दिवशी १०० रू. दंड आकारण्यात येईल.

२२) इ.बी.सी. साठी उत्पन्नाचा दाखला इ.बी.सी. अर्जासहीत ताबडतोब सादर करावा. ई.बी.सी. अर्ज बिनचूक भरावा. अपूर्ण माहितीचा अर्ज व उत्पन्नाचा दाखला वरीष्ठ कार्यालयाने नामंजूर केल्यास संपूर्ण फी विद्यार्थ्यांला भरावी लागेल. नामंजूरीसाठी कार्यालय जबाबदार राहणार नाही.

प्रवेश अर्जात नमूद केलेला पालकाचा व्यवसाय व उत्पन्न व फी माफीच्या अर्जात रकाना ७ मध्ये नमूद केलेला व्यवसाय व उत्पन्न सारखे असावसाय पाहिजे. फी माफीचा अर्ज प्रवेश घेतल्यानंतर ३१ जुलै पूर्वी कार्यालयात सादर करावा. सोबत प्रवेश घेतल्याची पावती असणे आवश्यक आहे. त्या पावतीवरच फी माफीचा अर्ज मिळाल्याची संबंधित लिपीक पोच देईल.

* **आर्थिक सवलत – शिष्यवृत्ती (स्कॉलरशिप)**

अनुसूचित जाती/जमाती,विमुक्त जाती व भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरीता उपलब्ध असलेल्या भारत सरकारच्या शिष्यवृत्त्या मिळविता येतात. (अशा विद्यार्थ्यांनी ऑन लाईन अर्ज भरुन कार्यालयात आणुन द्यावा.)

* **शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना सुचना**

१) शिष्यवृत्ती अगर इतर सवलतधारक विद्यार्थ्यांना प्रत्येक तासिकेला ७५% उपस्थिती आवश्यक आहे.

२) शिष्यवृत्तीधारक (एस.सी/एस.टी./ओ.बी.सी./व्हीजेएनटी/एसबीसी/ अल्पसंख्यांक) विद्यार्थ्यांनी ऑन लाईन अर्ज सादर करावयाचे आहे.

३) पूर्ण प्रमाणपत्रे / दाखले असल्याशिवाय शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन होणार नाही.

४) ऑनलाईन अर्ज प्रवेश घेतल्यानंतर तीन दिवसात सादर करावा.

**शिष्यवृत्ती अर्जासोबत पुढील प्रमाणपत्र / दाखले जोडणे आवश्यक आहे.**

१) शाळा/म.वि. सोडल्याचा (टी.सी.) दाखल्याची व मुळ गुणपत्रिकेची सत्यप्रती.

२) जातीच्या दाखल्याची सत्यप्रत.

३) पूर्वीच्या शाळेचा शिष्यवृत्ती ओदश क्रमांक प्राचार्यांच्या सही-शिक्यानिशी जोडावा.

४) १२ वी ची परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर खंड असल्यास खंड प्रमाणपत्र जोडावे.

५) उत्पन्नाचा दाखला (तहसिलदाराचा)

६) आधारकार्ड जोडावे.

७) २ पासपोर्ट फोटो (नुकते काढलेले असावे.)

८) डुप्लीकेट टि.सी. वर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना कोणतीही शिष्यवृत्ती अगर ईतर सवलत मिळणार नाही.

९) प्रत्येक शिष्यवृत्तीधारकं विद्यार्थ्यांनी नजीकच्या बँकेत स्वतःच्या नावाचे खाते असणे आवश्यक आहे.

१०) अपूर्ण कागदपत्र असलेले शिष्यवृत्ती अर्ज नामंजूर झाल्यास विद्यार्थी जबाबदार राहील.

*** आर्थिकदृष्ट्या मागसवर्गीय विद्यार्थ्यांना फी माफीची सवलत (ई.सी.बी. कन्सेशन)**

अ) ज्या विद्यार्थ्यांचे आई–वडील, पालक यांचे वार्षिक उत्पन्न १ लाख रू. किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा विद्यार्थ्यांनी अर्थिकदृष्ट्या मागसवर्गासाठी पुरस्कृत करण्यात आलेल्या फी सवलतीचा फॉर्म योग्य माहितीसह भरून व त्यासोबत तहसिलदार अथवा सरपंच (विशिष्ट लोकसंख्येच्या नियमाप्रमाणे) यांच्याकडून उत्पन्नाचा दाखला प्राप्त करून तो आवेदनपत्रास जोडावा. आई–वडील हयात नसल्यास तसा दाखला सादर करावा लागेल. अन्यथा फी सवलत नाकारल्या जाईल.

ब) शिक्षणात खंड पडत असल्यास खंड प्रमाणपत्र (गॅप सर्टिफिकेट) सादर करावे लागेल अन्यथा फी सवलत नाकारल्या जाईल.

क) ज्या सरकारी किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांचे कर्मचाऱ्याचे मुळ पगाराचे वार्षिक उत्पन्न २,लाख रु. चे आत आहे. अशांच्या मुलांना फी सवलत मिळेल.

ड) प्राथमिक / माध्यमिक शिक्षकांच्या मुलांना फी माफीची सवलत मिळते.

*** शिस्त**

महाविद्यालयाने संमत केलेल्या नियमांचे पालन करून प्रत्येक विद्यार्थ्यांने शिस्तीने वागणे अनिवार्य आहे. महाविद्यालयात व महाविद्यालयाच्या परिसरात विद्यार्थ्यांने आपली वागणूक उत्कृष्ट ठेवावी.

*** ओळखपत्र**

या महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांजवळ ओळखपत्र असणे आवश्यक आहे. रू. १० व पासपोर्ट आकाराचा फोटो ग्रंथालयात देऊन विद्यार्थ्यांना ओळखपत्र मिळवता येईल.

*** वैद्यकीय तपासणी**

विद्यापीठाच्या नियमानुसार विद्यार्थ्यांची वर्षातून एकदा वैद्यकीय चाचणी घेतली जाईल. कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांला ही चाचणी देणे आवश्यक राहील . या चाचणीत उपस्थित न झाल्यास ५० रु.दंड करण्यात येईल.तसेच वार्षिक परीक्षेला बसता येणार नाही.

*** ग्रंथालय**

ग्रंथालयाची इमारत स्वतंत्र असून सर्व ग्रंथानी ग्रंथालय परिपूर्ण आहे.
महाविद्यालयाचे ग्रंथालयात अभ्यासाची पुस्तके, सदंर्भ ग्रंथ, दैनिके उपलब्ध राहतील. ओळखपत्राशिवाय ग्रंथालयात प्रवेश नाकारला जाईल. महाविद्यालयाची सर्व पुस्तके वार्षिक परिक्षेचे पूर्वी परत करावी लागतील. यानंतर पुस्तके लागल्यास पुस्तकांची पूर्ण किंमत अनामत रक्कम म्हणुन ठेवून पुस्तके मिळू शकतील. यासबंधीचे निर्णय प्राचार्याचे आदेशानुसार ग्रंथपालावर अवलंबून राहील.